२१|टि.

महसूल व वन विभाग/फ-७

पूर्व-पृष्ठावरील टिप्पणी व शासनाचे दि.२६ ऑक्टोबर,२००९ चे आदेश कृपया पहावेत.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (हेड ऑफ फॉरेस्ट फोर्स), प्रधान मुख्य वनसंरक्षक व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक या श्रेणीतील रिक्त पदावर पदोन्नती करण्याकरिता विभागीय छाननी समितीची बैठक मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२० जुलै,२००९ रोजी आयोजित केली होती. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षकाच्या २ रिक्त पदापैकी एका पदावर पदोन्नतीकरिता निवड समितीने डॉ.एस.के.खेतरपाल, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नागपूर यांची निवड केली. तर दुस-या रिक्त पदावर पदोन्नतीकरिता सेवाज्येष्ठतेनुसार श्री.पी.जे.ठोसरे, संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे यांचा विचार करण्यात आला. मात्र त्यांच्या पदोन्नतीबाबतचा निर्णय काही प्रशासकीय कारणास्तव निवड समितीने खुला ठेवला असून, त्यांच्या पदोन्नतीबाबतचा निर्णय नंतर घेण्यात येईल असे निवड समितीने ठरविले आहे.

३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक या श्रेणीतील रिक्त पदावर पदोन्नती करण्याकरिता विभागीय छाननी समितीने श्री.पी.जे.ठोसरे, भा.व.से. यांच्या गोपनीय अभिलेख्यांचे अवलोकन केले असता,त्यांच्या सन २००५-०६ या वर्षाच्या गोपनीय अभिलेखामध्ये प्रतिकूल शेरे नमूद असल्याचे विभागीय छाननी समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांच्या पदोन्नतीबाबतचा निर्णय नंतर घेण्यात यावा असे निवड समितीने ठरविले आहे. श्री.पी.जे.ठोसरे, भा.व.से. यांच्या सन २००५-०६ या वर्षाच्या गोपनीय अभिलेखामधील प्रतिकूल शेऱ्यासंबंधी श्री.ठोसरे यांचे निवेदन मागविण्यात आले होते. त्यांनी सादर केलेले निवेदन विचारात घेऊन, श्री.पी.जे.ठोसरे, भा.व.से. यांच्या सन २००५-०६ या वर्षाच्या गोपनीय अभिलेखामध्ये नमूद केलेले प्रतिकूल शेरे काढून टाकण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्याबाबतचे आदेश दि.२६/१०/२००९ च्या शासन आदेशान्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

४. श्री.पी.जे.ठोसरे, भा.व.से. यांच्या सन २००५-०६ या वर्षाच्या गोपनीय अभिलेखामध्ये नमूद केलेले प्रतिकूल शेरे काढून टाकण्यात आले आहेत, ही बाब विभागीय छाननी समितीच्या निदर्शनास आणण्यात यावी. त्याकरिता विभागीय छाननी समितीची बैठक मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करणे आवश्यक आहे. सदर बैठक आयोजित करण्याकरिता मा.मुख्य सचिवांना सोयीचा असा बैठकीचा दिनांक व वेळ कळविण्याची विनंती करण्यात यावी.

सहसचिव (श्री.का.)

प्रधान सचिव (वने)

मा.मुख्य सचिव